# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दि.३० एप्रिल,२०२२

**जळगाव दि.३० (प्रतिनिधी) कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील कक्ष अधिकारी श्री. महेंद्र रघुनाथ वाघ यांना सेवानिवृत्तीबद्दल आज शनिवार दि.३० एप्रिल रोजी कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली निरोप देण्यात आला.**

विद्यापीठ अधिसभागृहात झालेल्या कार्यक्रमात श्री. महेंद्र रघुनाथ वाघ यांनी केलेल्या सेवेचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रभारी कुलसचिव प्रा.किशोर पवार, दुर्योधन साळुंखे, आर.एम.पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर श्री.वाघ यांनी सत्काराला उत्तर दिले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू यांनी श्री.वाघ यांची प्रत्येक कामातील स्फूर्ती आणि उत्साहाने लक्षात येऊ दिले नाही की, त्यांचे वय ५८ ला पोहचले. यावेळी प्रभारी प्र- कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, प्रभारी कुलसचिव डॉ. किशोर पवार, परीक्षा व मूल्यामापन मंडळाचे संचालक प्रा.दीपक दलाल यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यापीठाच्यावतीले तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, मागावर्गीय शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, उमवि कर्मचारी पतपेढी यांच्यावतीने श्री. वाघ यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रविण चंदनकर यांनी केले. कार्यक्रमास विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी